# महाराष्ट्र शासन
## नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र.२४९२७६३१-०२२.
विस्तारीत क्र.१२१
इ-मेल- cadredesk.dma@gmail.com
वेबसाईट-https://mahadma.maharashtra.gov.in

शासकीय परिवहन सेवा इमारत, तिसरा मजला,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.४०००३०-
कार्यासन क्र.०३.


क्र. नपप्रसं-२०२१/ ऑनलाईन प्रशिक्षण/कक्ष-३/1249 दिनांक :- 16 APR 2021

प्रति,
१. मा. उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
२. मा. सहायक आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)

विषय :- विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हा प्रशासन कार्यालय तसेच नगरपरिषद/ नगरपंचायतींचे मुख्याधिकारी व कर्मचाऱ्यांना कौशल्य व विकास कार्यक्रमांतर्गत ऑनलाईन प्रशिक्षण देणे बाबत.

वरील विषयान्वये कळविण्यात येते की, कौशल्य व विकास कार्यक्रमांतर्गत दर महिन्याच्या ३ ऱ्या आठवड्यात महाराष्ट्र राज्यसेवा नगरपरिषद संवर्ग कर्मचारी यांच्यासाठी फेसबुक ऑनलाईनव्दारे प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे.

एप्रिल २०२१ पासून नविन आर्थिक वर्ष चालू होत आहे. त्याअनुषंगाने नविन आर्थिक वर्ष नविन संकल्पना / नव्या उमेदीने सुरू करावयाचे असून त्याकरिता नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून नविन उपक्रम, नविन योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर नविन उपक्रम म्हणजे CONNECT हा होय. ह्या (CONNECT = C- Core, O- Organized, N- Noble, N- Novel, E- Education, C- Cum, T- Training) कनेक्ट उपक्रमाव्दारे DRDMA, DAO, राज्यसेवा संवर्गातील कर्मचारी तसेच नगरपरिषद कर्मचारी यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. सदर उपक्रमांतर्गत एप्रिल महिन्यातील on line Facebook live प्रशिक्षणामध्ये व्याख्यात्यांचे व्याख्यान न होता विभागांतर्गत कार्यरत असलेले नगरपरिषद संवर्ग अधिकारी / कर्मचारी स्वत: त्यांचे Presentation करण्याचे प्रस्तावित आहे. संवर्ग कर्मचारी ज्या कार्यक्षेत्रात काम करत आहेत त्या कार्यक्षेत्रातील त्यांचा अनुभव मांडण्याची संधी त्यांना देण्यात येणार असून त्याव्दारे शिकण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यासाठी कनेक्ट या उपक्रमांतर्गत उपायुक्त, न.प.प्र. विभागीय आयुक्त कार्यालय व सहायक आयुक्त, न.प.प्र.विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय यांची महत्वाची भूमिका असणार आहे. त्या भूमिकेच्या अनुषंगाने प्रत्येक विभागीय कार्यालय त्यांच्याशी संबंधीत जिल्हा प्रशासन कार्यालयाशी समन्वय साधून Presentation सादर करणाऱ्यांची नावे निश्चिती करुन त्यांचे विषय निश्चित करावेत. त्यानंतर एप्रिल महिन्याच्या दूसऱ्या आठवड्यात सदर कर्मचाऱ्यांचा सादरीकरणाचा त्यांच्या विषयानुसार रंगीत सराव घ्यावा व त्याप्रमाणे नगरपरिषद प्रशासन संचालनालयास कळवावे. उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर एप्रिलच्या ३ ऱ्या आठवड्यात ऑनलाईन प्रशिक्षणाबाबतची कार्यवाही संचालनालयामार्फत करण्यात येईल.

ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याबाबत खालीलप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे.

१. <u>स्थापत्य अभियांत्रिकी सेवा</u> :-

**विषय:- SWOT ANALYSIS OF MY COUNCIL POWER POINT PRESENTATION.**

**सहभाग :-** सर्व विभागांचा.

**सादरीकरण:- नागपूर, औरंगाबाद, व नाशिक विभाग.**

उक्त तीन विभागातील ०३ नगरपरिषदा याप्रमाणे ०९ नगरपरिषदा. विभागातील जिल्ह्यांची निवड करण्याचे स्वातंत्र्य उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय यांना असेल. जिल्ह्यातील नगरपरिषद व स्थापत्य अभियंता यांची निवड करण्याचे स्वातंत्र्य सहायक आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय यांना असेल. या प्रमाणेच इतर संवर्गासाठी सुध्दा ही बाब लागू असेल.

२. **<u>संगणक अभियांत्रिकी सेवा</u> :-**

**<u>सहभाग</u> :-** सर्व विभाग.

**<u>सादरीकरण करणारे जिल्हे</u>:-** पुणे, सातारा व कोल्हापूर.

प्रश्न मंजूषा कार्यक्रमाअंतर्गत जो जास्तीत जास्त प्रश्नांची कमी वेळेत अचूक उत्तर देईल तो विजेता घोषित केला जाईल. सदर प्रश्न मंजूषेसाठी खालीलप्रमाणे प्रश्न तयार करावे.

- संगणकीकरण व पी जी पोर्टल या विषयासंबंधी ३० प्रश्न.
- संगणकीय विज्ञान व माहिती व तंत्रज्ञान या विषयासंबंधी ३० प्रश्न.
- आपले सरकार, GIS व ईटेंडर या विषयासंबंधी ३० प्रश्न.

३. **<u>पाणीपुरवठा अभियांत्रिकी सेवा</u> :-**

**<u>विषय</u>:-** SUCCES STORY RELATED TO WATER SUPPLY, SOLID WASTE MANAGEMENT

**<u>सहभाग</u>:-** सर्व विभाग.

**<u>सादरीकरण करणारे विभाग</u>:- अमरावती, पुणे व कोकण.**

उक्त विभागातील ०३ नगरपरिषदा याप्रमाणे ०९ नगरपरिषदा. विभागातील जिल्ह्यांची निवड करण्याचे स्वातंत्र्य उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय यांना असेल. जिल्ह्यातील नगरपरिषदांची निवड करण्याचे स्वातंत्र्य सहायक आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय यांना असेल.

४. **<u>लेखापाल व लेखापरिक्षक सेवा</u> :-**

**<u>सहभाग</u>:-** सर्व विभाग.

**सादरीकरण करणारे विभाग :-** कोकण व पुणे.

उक्त विभागातील ०३ नगरपरिषदा याप्रमाणे ०६ नगरपरिषदा.

कोकण विभागाने लेखापाल व लेखापरिक्षक सेवेतील कर्मचारी यांचेकडून लेखा विभागाशी संबंधित संज्ञांचा संपूर्ण स्पष्टीकरणासह शब्द कोष बनवणे.

पुणे विभागाने लेखापाल व लेखापरिक्षक म्हणून माझी जबावदारी या विषयासंबंधी माझी जबाबदारी या विषयावर सादरीकरण करणे.

विभागातील जिल्ह्यांची निवड करण्याचे स्वातंत्र्य उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय यांना असेल. जिल्ह्यातील नगरपरिषदांची निवड करण्याचे स्वातंत्र्य सहायक आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय यांना असेल.

E.6 APR 2021

५. **<u>करनिर्धारण व प्रशासकीय सेवा :-</u>**

**सहभाग आणि सादरीकरण :- कोकण, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक व अमरावती.**

प्रत्येक विभागातील ०३ नगरपरिषदा याप्रमाणे १८ नगरपरिषदा.

कोकण आणि नागपूर विभागाने **मी लढलो कोरोनाशी यााबाबत आलेले अनुभव, कोरोना बाधीत म्हणून किंवा कोरोनासाठी उपाययोजना आणि त्यावेळी आलेले अनुभव मांडणे** याबाबत त्यांच्या विभागातील कर्मचारी यांचेकडून सादरीकरण करुन घ्यावे.

पुणे व औरंगाबाद विभागाने **मी कर वसुलीसाठी / कराचे उत्पन्न वाढविण्यासाठी काय केले** या विषयावर याबाबत त्यांच्या विभागातील कर्मचारी यांचेकडून सादरीकरण करुन घ्यावे.

नाशिक आणि अमरावती विभागाने **स्वच्छ सर्वेक्षणात माझी भुमिका** या विषयावर याबाबत त्यांच्या विभागातील कर्मचारी यांचेकडून सादरीकरण करुन घ्यावे.

विभागातील प्रत्येकी ३ नगरपरिषदांची निवड करावयाची आहे. विभागातील जिल्ह्यांची निवड करण्याचे स्वातंत्र्य उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय यांना असेल. जिल्ह्यातील नगरपरिषद व करनिर्धारण व प्रशासकीय सेवेतील कर्मचारी यांची निवड करण्याचे स्वातंत्र्य सहायक आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय यांना असेल.

उक्तप्रमाणे उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय यांनी त्यांच्याशी संबंधीत जिल्हा प्रशासन कार्यालयाशी समन्वय साधून Presentation सादर करणाऱ्यांची नावे निश्चिती करुन त्यांचे विषय निश्चित करावेत. त्यानंतर एप्रिल महिन्याच्या दूसऱ्या आठवड्यात सदर कर्मचाऱ्यांचा सादरीकरणाचा त्यांच्या विषयानुसार रंगीत सराव घ्यावा व त्याप्रमाणे नगरपरिषद प्रशासन संचालनालयास कळवावे.

**मा.आयुक्त तथा संचालक यांच्या निर्देशान्वये,**

(श्याम पोशेट्टी)
प्र. उपायुक्त,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.